नेहरू युवा क्रिडा आणि सांस्कृतिक मंडळ चिखली,

# गावंडे कॉलेज ऑफ फार्मसी

**साखरखेर्डा, तालुका: सिंधखेड राजा, जि.: बुलडाणा**

**द्वारा आयोजित**

# आंतरराष्ट्रीय योग दिवस

**प्रसंगी एक विशेष व्याख्यान,**

# कार्यक्रमाचा अहवाल

## "गावंडे कॉलेज ऑफ फार्मसीमधे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा."

शहरातच नव्हेतर ग्रामीण भागातील व्यक्तींना सुध्दा योगाचे महत्व कळावे यासाठी नेहरू युवा क्रिडा व सांस्कृतिक मंडळ, चिखली द्वारा संचालित डॉ. निलेशजी गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गावंडे कॉलेज ऑफ फार्मसी येथे योग दिवस साजरा करण्यात आला.व्यक्ती च्या जीवनात शारीरिक आणि आत्मिक विकासासाठी योग विद्येचे महत्व आहे करिता एक विषेश व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पि.ए.पाटील सर हे होते. प्रसंगी लाभलेल्या प्रमुख वक्त्या डॉ. अर्चना ठोसरे, यांनी योग म्हणजे काय?वैद्न्यानिक आणि योग्य पद्धतीने योग कसे करावे याबद्दल सखोल माहिती दिली. तसेच डॉ. देशपांडे यांनी योगाचे फायदे व आहार कसा असावा याविषयी मार्गदर्शन केले.




तर प्रास्ताविकात श्री वाय.बी. राऊत यांनी संस्थेविषयी माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतात डॉ. पि.ए.पाटील यांनी, योग हा फक्त शहरी भागात च नव्हेतर ग्रामीण भागातील नागरिकांना देखील योगाचे महत्त्व पटवून त्यांचा शारीरिक आणि आत्मिक विकास होने गरजेचे आहे. पुढे बोलतांना ते म्हणाले, आपण जे काही असाध्य रोग आहेत ते सुध्दा योग साधनेने नियंत्रणात ठेवू शकतो परंतु त्यामध्ये सातत्य आवश्यक आहे.




कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, संस्थेचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. एन.ए.लोढे यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री.आर.आर.जाजू यांनी केले.